22 NOV 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सामर्थ्यशाली भारताचे स्वप्न शाहूंच्या विचारात

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन : आंतरराष्ट्रीय परिषदेचा समारोप

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शाहू महाराजांच्या कृतिशील कार्यात स्वातंत्र्य, समता, बंधुभाव व मानवता या मूल्यांचा पुरस्कार करणारी प्रागतिक विचारधारा आहे. तसेच लोककल्याणकारी प्रजाहित 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' ही तत्त्वप्रणाली आहे. त्यांच्या पुरोगामी विचारधारेत सामाजिक बांधिलकी व ऐक्याचे सुराज्य उभे करण्याचे सामर्थ्य होते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.



परिषदेच्या समारोपप्रसंगी बोलताना कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के.

न्यू कॉलेजमध्ये 'राजर्षी शाहू छत्रपती : दृष्टिकोन, योगदान व समकालीन प्रस्तुतता' या विषयांवरील दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. रमेश जाधव म्हणाले, राजर्षी शाहू महराजांनी कला, क्रीडा, शिक्षण, साहित्य, व्यापार, उद्योग अशा जीवनाच्या सर्वच क्षेत्रामध्ये योगदान दिले आहे. शाहूंच्या विचारांचा जागर होण्यासाठी अशा प्रकारच्या परिषदांची आवश्यकता आहे.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी केले. प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे अध्यक्ष बी. जी. बोराडे, चेअरमन के. जी. पाटील, व्हा. चेअरमन डी. जी. किल्लेदार, आर. डी. पाटील, सविता पाटील, वाय. एस. चव्हाण, उपप्राचार्य डॉ. ए. एम. शेख उपस्थित होते. डॉ. अर्चना कांबळे यांनी आभार मानले.